जनसंपर्क कक्ष

0 6 MAR 2022 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारताच्या प्रगतीत युवा पिढीने योगदानास सज्ज व्हावे- राज्यपाल

**कोल्हापूर :** भारताची वाटचाल आणि प्रगतीमध्ये प्रत्येक घटकाचे योगदान लाभेल, तेव्हाच देश आत्मनिर्भर होईल. त्या दृष्टीने युवा पिढीने योगदान देण्यास सज्ज व्हावे, असे आवाहन राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगत सिंह कोश्यारी यांनी शनिवारी येथे केले.



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त समारंभ आभासी स्वरूपात साजरा झाला. समारंभाचे अध्यक्ष कोश्यारी मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाद्वारे ६२ हजार ३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या.

आपल्या वैज्ञानिक व तंत्रज्ञानात्मक नवोन्मेषाच्या अभिव्यक्तीमध्ये कालसुसंगत संयुक्तिकता व मूल्य असले पाहिजे, याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी. या बाबी जागतिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी आणि शाश्वत उपाय प्रदान करतात, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजी या संस्थेचे संचालक डॉ. दिनकर एम. साळुंके यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

विद्यापीठाचा वार्षिक अहवाल कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी सादर केला. प्रभारी संचालक जी.आर. पळसे, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, डॉ. आर.के. कामत, डॉ. एस.एस. महाजन, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. श्रीमती एम.व्ही. गुळवणी उपस्थित होते. डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 MAR 2022
पुढारी

# युवा पिढीच्या योगदानातून भारत आत्मनिर्भर बनेल

## राज्यपाल कोश्यारी; नवभारताच्या उभारणीत विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची : डॉ. दिनकर साळुंके



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात स्नातकांना ऑनलाईन संबोधित करताना कुलपती भगतसिंह कोश्यारी.



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके.

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जीवनात कितीही संकटे आली तरी न डगमगता वाटचाल केल्यास यशाच्या शिखरावर पोहोचता येते. प्रत्येक घटकाच्या योगदानानेच देश सर्वश्रेष्ठ व आत्मनिर्भर होईल. त्यासाठी युवा पिढीने योगदान देण्यास सज्ज राहावे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले. तर प्रमुख पाहुणे इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजी संस्थेचे संचालक डॉ. दिनकर एम. साळुंके यांनी, नवभारताच्या उभारणीत विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त समारंभ राजर्षी शाहू सभागृहात शनिवारी झाला. यावेळी ६२ हजार ३६० स्नातकांना पान ४ वर

### इतिहासात शिवरायांचे विशेष स्थान

इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे विशेष स्थान आहे. तसेच स्थान शैक्षणिक क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाने मिळविण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन करून राज्यपाल कोश्यारी म्हणाले, जगाला भारताकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचे काम युवा पिढी सक्षमपणे करू शकते. त्यासाठी त्यांनी आत्मनिर्भर व्हावे. नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषांना पुढे नेण्याचा प्रयत्न आहे. शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक कार्य योग्य दिशेने सुरू असल्याचा गौरवपूर्ण उल्लेखही त्यांनी केला.

# युवा पिढीच्या योगदानातून भारत आत्मनिर्भर बनेल

**(पान १ वरून)** पदवी देण्यात आली. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरून प्रसारित कार्यक्रमात ३ हजार ५०० जण ऑनलाईन सहभागी झाले होते.

**भारत जगातील टॉप-१२ बायोटेक्नॉलॉजी डेस्टिनेशन्समध्ये**

नव्या शैक्षणिक धोरणात सर्वसमावेशकता व शैक्षणिक पाया भक्कम करण्याची लवचीकता आहे. आज जागतिक विज्ञानात भारताचे योगदान उल्लेखनीय आहे. भारत जगातील टॉप-१२ बायोटेक्नॉलॉजी डेस्टिनेशन्समध्ये आहे. भारतातील बायोटेक उद्योगांमध्ये ८ हजारांहून अधिक बायोटेक स्टार्ट-अप व बायोटेक कंपन्यांचा समावेश आहे. लसनिर्मिती क्षेत्रात भारत एक महत्त्वाचा देश असून, युनिसेफला पुरविल्या जाणाऱ्या लसींमध्ये ६० टक्के वाटा भारताचा आहे. कोरोना काळात स्थानिक पातळीवर व जलदगतीने लस निर्माण करण्याच्या क्षमतेमुळे साथीच्या आजाराचे योग्य व्यवस्थापन करू शकलो. देशातील उच्चशिक्षणाच्या सर्वोत्तम संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठ गणले जाईल,





**शिवाजी विद्यापीठाच्या ५८व्या दीक्षान्त समारंभात वार्षिक अहवाल सादर करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. जी. कुलकर्णी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, जी. आर. पळसे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. एम. व्ही. गुळवणी.**

अशी अपेक्षाही डॉ. साळुंके यांनी व्यक्त केली.

उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योगनिर्मिती, नावीन्यपूर्ण व अभिनव संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण व भविष्यवेधी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम या पंचसूत्रीच्या बळावर शिवाजी विद्यापीठाची वाटचाल सुरू असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

कुलगुरू कार्यालयापासून ते राजर्षी शाहू सभागृहापर्यंत दीक्षान्त मिरवणुकीने समारंभास प्रारंभ झाला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी ज्ञानदंड घेऊन मिरवणुकीचे नेतृत्व केले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. तृप्ती करेकट्टी व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. जी. कुलकर्णी, आंतरविद्या विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. एम. व्ही. गुळवणी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी जनसंघर्ष सेनेच्या कार्यकर्त्यांनी राज्यपालांविरुद्ध घोषणा दिल्या.

0 6 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापुरात शनिवारी शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ऑनलाईन पार पडला. त्यात प्रमुख पाहुण्यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. या समारंभाचे विद्यापीठाच्या शिववार्ता युट्युब वाहिनीवरून प्रक्षेपण केले. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील कुलगुरु कार्यालयापासून ते राजर्षी शाहू सभागृहापर्यंत दीक्षान्त मिरवणूक काढण्यात आली. त्यात कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, अधिष्ठाता सहभागी झाले. (छाया : आदित्य वेल्हाळ)

# वैज्ञानिक दृष्टिकोनातूनच आत्मनिर्भर भारताची उभारणी शक्य

(पान १ वरून) कुलपंती भगतसिंह कोश्यारी होते. उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुभेच्छा दिल्या. कोरोनाबाबतच्या निर्बंधामुळे यंदा प्रत्यक्षात कोणतीही पदवी या समारंभामध्ये प्रदान करण्यात आली नाही. राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती ऐश्वर्या मोरे, कुलपती पदक विजेती स्वाती पाटील यांची नावे जाहीर केली. ऑनलाइन दीक्षांत समारंभात साडेतीन हजार जण सहभागी झाले.

नव्या शैक्षणिक धोरणातील लवचिकता विद्यार्थी विकासासाठी उपयुक्त ठरणारी आहे. शिवाजी विद्यापीठ स्थापनेपासून राष्ट्र उभारणीत मोलाचा वाटा उचलत असून सर्वच क्षेत्रांसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध करून देत आहे. भविष्यात हे विद्यापीठ देशातील उच्चशिक्षणाच्या सर्वोत्तम संस्थांमध्ये गणले जाईल, असा विश्वास डॉ. साळुंखे यांनी व्यक्त केला. इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे जसे विशेष स्थान आहे, तसेच स्थान शैक्षणिक क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाने प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. सध्या जग विविध समस्यांनी ग्रस्त आहे. त्यावर उपाय योजण्याचे काम युवा पिढीच सक्षमपणे करू शकते. नवोन्मेष,नवविचार,दर्जा या बळावर आपल्याला आत्मनिर्भर व्हायचे आहे, ही बाब नव पदवीधरांनी लक्षात ठेवावी, असे आवाहन राज्यपाल कोश्यारी यांनी केले. या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, आर. जी. कुलकर्णी, एस. एस. महाजन, मेघा गुळवणी, आदी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल मांडला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी पदवीधरांची माहिती दिली. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. धैर्यशील यादव, तृप्ती करेकट्टी यांनी सूत्रसंचालन केले.

## धवलक्रांतीत कोल्हापूरचेही योगदान

आपल्या देशाची धवलक्रांती जगाला मार्गदर्शक आहे. या क्रांतीत कोल्हापूरचेही योगदान आहे. सध्या आपला देश जगातील टॉप १२ बायोटेक्नॉलॉजी डेस्टिनेशन्समध्ये असून, आशिया-पॅसिफिक विभागात तिसऱ्या क्रमांकावर आहे. कोरोना लस, औषध निर्मिती, जेनरिक औषध निर्मिती, अंतराळ संशोधन, आयटी आणि कृषी क्षेत्रातील कामगिरी लक्षात घेता, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञांच्या मजबूत फळीच्या जोरावर ज्ञान-महासत्ता होण्यास भारत सक्षम आहे. मध्यमवर्गाला कमी खर्चात चांगले शिक्षण देऊन, त्यांच्यात दर्जेदार कार्यशक्ती विकसित करता येईल. त्या दृष्टीने केंद्र आणि राज्यसरकार विविध उपक्रमांमध्ये गुंतले असल्याचे डॉ.साळुंखे यांनी सांगितले.

## मुख्य इमारतीतून मिरवणूक

- विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील कुलगुरु कार्यालयापासून ते राजर्षी शाहू सभागृहापर्यंत दीक्षान्त मिरवणूक काढण्यात आली. त्यात कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, अधिष्ठाता सहभागी झाले.
- 'शिववार्ता' वाहिनीवरुन समारंभाचे प्रक्षेपण करण्यात आले. ऑनलाइन समारंभामुळे विद्यापीठ परिसरात शुकशुकाट होता. दरम्यान, तांत्रिक अडचणीमुळे उच्चशिक्षणमंत्री उदय सामंत या समारंभात सहभागी झाले नाहीत.

06 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येकाच्या योगदानानेच देश आत्मनिर्भर

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी : शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त समारंभ उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारताची वाटचाल आणि प्रगती यांमध्ये जेव्हा प्रत्येक घटकाचे योगदान लाभेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने देश सर्वश्रेष्ठ आणि आत्मनिर्भर होईल. त्यादृष्टीने युवा पिढीने योगदान देण्यास सज्ज व्हावे, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी शनिवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभाचे अध्यक्ष म्हणून स्नातकांना ऑनलाईन पद्धतीने संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी समारंभाचे प्रमुख पाहुणे तथा नवी दिल्ली येथील इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजी संस्थेचे संचालक डॉ. दिनकर एम. साळुंके यांच्यासह शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते.

राज्यपाल कोश्यारी म्हणाले, सध्या जग विविध समस्यांनी ग्रस्त आहे. त्यावर उपाय योजण्याचे काम युवा पिढीच सक्षमपणे करू शकते. नवोन्मेष, नवविचार आणि दर्जा या बळावर आपल्याला आत्मनिर्भर व्हायचे आहे, ही बाब नवपदवीधर विद्यार्थ्यांनी सदैव लक्षात ठेवावी. पदवीची प्राप्ती ही या नवीन प्रवासाची खरी सुरुवात आहे. त्यामुळे आयुष्यात कोणतेही काम करताना सर्वोत्तमतेचा ध्यास घेऊन करा आणि उच्च ध्येय ठेवून वाटचाल करा. हाती घेतलेले उपक्रम पूर्ण करताना उत्तम दर्जासाठी आग्रही राहावे. जेणेकरून त्याची फलनिष्पत्तीही उत्तम राहील. विद्यापीठाचे कुलगुरू आणि येथे कार्यरत सर्वांचे काम उत्कृष्टपणे सुरू असल्यामुळे शिवाजी विद्यापीठाची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत आहे, असे ते म्हणाले.

इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे जसे विशेष स्थान आहे, तसेच स्थान शैक्षणिक क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाने प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा राज्यपाल कोश्यारी यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक कार्य योग्य दिशेने सुरू असून, ते देशातील प्रगतिशील विद्यापीठांपैकी एक म्हणून नावाजलेले आहे. यापुढील काळातही विद्यापीठाने आपली कामगिरी उंचावत अधिकाधिक लौकिक प्राप्त करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके म्हणाले, नवभारताच्या उभारणीत विद्यार्थ्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असणार आहे. त्यादृष्टीने आपल्या वैज्ञानिक व तंत्रज्ञानात्मक नवोन्मेषाच्या अभिव्यक्तीमध्ये कालसुसंगत संयुक्तिकता व मूल्य असले पाहिजे, याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी, कारण या बाबी जागतिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी आणि शाश्वत उपाय प्रदान करतात. नवस्नातकांनी आता आयुष्याच्या आणि उच्च शिक्षणाच्या पुढच्या टप्प्यात प्रवेश करत असताना बौद्धिक चपळता वाढवणे महत्त्वाचे आहे.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सादर केला. उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योगनिर्मिती, नावीन्यपूर्ण व अभिनव संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भविष्यवेधी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम या पंचसूत्रीच्या बळावर विद्यापीठाने आपली वाटचाल चालवली असल्याचे त्यांनी सांगितले. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत हे तांत्रिक अडचणीमुळे सहभागी होऊ न शकल्याने त्यांनी स्नातकांना शुभेच्छा दिल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

समारंभाची सुरुवात व समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वागत केले, तर प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. परीक्षा संचालक पळसे यांनी दीक्षान्त समारंभात प्रदान करावयाच्या पदव्या, पदविका आणि प्रमाणपत्रांचे वाचन केले. सूत्रसंचालन डॉ. तृप्ती करेकट्टी आणि धैर्यशील यादव यांनी केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : वार्षिक अहवाल सादर करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. एस. पाटील, जी. आर. पळसे, डॉ. एस. एस. महाजन आदी मान्यवर.**

कुलगुरू कार्यालयापासून ते राजर्षी शाहू सभागृहापर्यंत दीक्षान्त मिरवणुकीने समारंभास प्रारंभ झाला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी हाती ज्ञानदंड घेऊन मिरवणुकीचे नेतृत्व केले. मिरवणुकीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता सहभागी झाले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी पसायदान सादर केले.

### ३,५०० जण सहभागी

गतवर्षीप्रमाणे यावर्षीही ऑनलाईन पद्धतीने दीक्षांत समारंभ पार पडला. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरून प्रसारित झालेल्या या कार्यक्रमात सुमारे ३५०० जण ऑनलाईन सहभागी झाले. या कार्यक्रमाद्वारे ६२,३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या.

# वैज्ञानिक दृष्टिकोनातूनच आत्मनिर्भर भारताची उभारणी शक्य

## दिनकर साळुंखे : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ; ऐश्वर्या मोरेला 'राष्ट्रपती सुवर्णपदक', स्वाती पाटीलला 'कुलपती सुवर्णपदक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हरितक्रांती, धवलक्रांती, अंतराळ संशोधन, माहिती व तंत्रज्ञान, विज्ञान, आदी क्षेत्रातील कामगिरीच्या जोरावर भारताने अविकसित देशांना विकासाची दिशा दाखविली आहे. आता त्यापुढे जाऊन वैज्ञानिक दृष्टिकोनातून आत्मनिर्भर भारताची उभारणी करायची आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ आणि पदवीधरांनी संशोधनासह विविध क्षेत्रात योगदान द्यावे, असे आवाहन इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँण्ड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. दिनकर साळुंखे यांनी शनिवारी नवी दिल्लीतून ऑनलाइन केले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ साध्या आणि ऑनलाइन पद्धतीने पार पडला. त्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा (पान ५ वर)



कोल्हापुरात शनिवारी शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ ऑनलाईन पार पडला. त्यात प्रमुख पाहुणे डॉ. दिनकर साळुंखे यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. (छाया : आदित्य वेल्हाळ)

### डॉ. साळुंखे यांचा नवपदवीधरांना सल्ला

- यशासाठी कोणतेही जादूचे सूत्र नाही.
- मिळविलेले ज्ञान, शिक्षणाच्या जोरावर स्वत:चा मार्ग तयार करा.
- नवोन्मेषाच्या अभिव्यक्तीमध्ये कालसुसंगत संयुक्तिकता, मूल्ये जपा.
- बौद्धिक चपळता वाढवून नवीन संधी साधण्यासाठी तत्पर राहा.

### पोस्टाने प्रमाणपत्र पाठविणार

या दीक्षांत समारंभांतर्गत ६२,३६० स्नातकांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठिवण्यात येणार आहे.

### देशातील प्रगतिशील विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू व सहकार्यांचे काम उत्कृष्टपणे सुरु असल्यामुळे देशातील प्रगतिशील विद्यापीठांपैकी एक म्हणून नावाजलेले आहे. यापुढील काळातही विद्यापीठाने अधिकाधिक लौकिक प्राप्त करावा, असे आवाहन कोश्यारी यांनी केले. प्रमुख पाहुणे डॉ. साळुंखे यांनी समारंभात मराठीतून भाषण केले. त्याबद्दल राज्यपाल कोश्यारी यांनी त्यांचे कौतुक केले.

Times of India

# 58th convocation of SUK held online

## Over 62,000 Students Got Degree Certificates

TIMES NEWS NETWORK

Kolhapur: The 58th convocation ceremony of the Shivaji University Kolhapur (SUK) was streamed live on the varsity's Youtube channel with 3,500 viewers tuning in on Saturday.

The one-hour event took place at the SUK's senate hall and it was streamed live for the students, their parents and staff members.

A total of 62,360 students — from science and technology, commerce and management, humanities and interdDisciplinary studies streams — were conferred with their degree certificates, which will be sent to them by post.

This year, the number of female students (32,520) receiving their degree certificates was more than the number of male students (29,840).

Rahul Gayakwad



Convocation procession taken out on the premises of the Shivaji University on Saturday morning

Maharastra Governor and unversity Chancellor Bhagat Singh Koshyari chaired the ceremony and Dr Dinkar Salunkhe, director of the International Centre for Genetic Engineering and Biotechnology, was the chief guest.

Addressing the attendees, Salunke said, "To become a knowledge superpower, a strong body of well-trained scientists, technicians and experts is needed in India. That capacity is definitely there in India. The ambitious middle-class can be given quality education at a low cost and a quality workforce can be developed. They can be enabled by providing the necessary technical skills. So, the central and state governments and their various departments are engaged in science and technology education, training and skills development initiatives"

Koshyari said, "Currently, the world is suffering from various problems and only the young generation can efficiently work out a solution. We want to be self-reliant on the strength of innovation, and quality is the attribute that graduate students should always keep in mind. Only when every factor contributes to the progress and development of India, our country will become superior and self-reliant."

0 6 MAR 2022 **तरुण भारत** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात मार्गदर्शन करताना राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. एस. पाटील, गजानन पळसे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. एम. व्ही. गुळवणी आदी.

# तरुणांच्या नवसंकल्पनेतूनच देश आत्मनिर्भर होईल

## डॉ. दिनकर साळुंके : शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारतात प्रशिक्षित शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व तज्ज्ञांची मजबूत फळी साकार होण्याची गरज आहे. नवीन अभ्यासक्रमानुसार एकाचवेळी विद्यार्थ्यांना दोन्ही आवडीच्या विषयाचे शिक्षण घेता येते. त्यामुळे



**ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके.**

वैज्ञानिक क्षेत्र सध्या प्रगतीपथावर आहे. विज्ञान क्षेत्रातील वाढत्या संशोधनाच्या जोरावर सर्व क्षेत्रात देशाने आघाडी घेतली आहे. तरुणांच्या नवसंकल्पनेतूनच देश आत्मनिर्भर बनेल, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजी या संस्थेचे संचालक डॉ. दिनकर साळुंके यांनी केले.

**पान ६ पहा**

# तरुणांच्या नवसंकल्पनेतूनच देश आत्मनिर्भर होईल

**पान १ वरून**

शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंग कोश्यारी होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुभेच्छा संदेश पाठवला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. ऐश्वर्या मोरे यांना राष्ट्रपती सुवर्णपदक तर स्वाती पाटील यांना कुलपती सुवर्णपदक जाहीर केले आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी ज्ञानदंड हातात घेऊन कुलगुरू कार्यालय ते राजर्षी शाहू सभागृहापर्यंत मिरवणूक काढली. या ऑनलाईन समारंभात सुमारे ३५०० जण सहभागी झाले.

यावेळी डॉ. साळुंके म्हणाले, नवभारताच्या उभारणीत विद्यार्थ्यांची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. त्या दृष्टीने वैज्ञानिक व तंत्रज्ञानात्मक नवोन्मेषाच्या अभिव्यक्तीमध्ये कालसुसंगत, संयुक्तिकता व मूल्य असली पाहिजेत. जागतिक समस्यांचे निराकरण शाश्वत उपाययोजना पाहिजेत. उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना ,बौद्धिक चपळता वाढवणे महत्त्वाचे आहे. एखादी नवीन संधी येते, तेंव्हा ती मिळवण्यासाठी तुम्ही सदैव तत्पर राहता. तुमच्या स्वतःच्या संधी निर्माण करण्यासाठीही तयार असता. विद्यार्थी म्हणून मिळवलेले शिक्षण आणि ज्ञानावर आधारित स्वतःचा मार्ग तयार केला पाहिजे. तुम्ही ज्याही क्षेत्रात जाल, तेथे प्रामाणिकपणा आणि बांधिलकी या दोन गुणांच्या बळावर सर्वोत्कृष्टतेचा ध्यास घेऊन कार्यरत राहावे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी म्हणाले, भारताची वाटचाल आणि प्रगतीमध्ये जेव्हा प्रत्येक घटकाचे योगदान लाभेल, तेव्हा देश सर्वश्रेष्ठ आणि आत्मनिर्भर होईल. त्या दृष्टीने युवा पिढीने योगदान देण्यास सज्ज व्हावे. सध्या जग विविध समस्यांनी ग्रस्त आहे. त्यावर उपाय योजना युवा पिढीच सक्षमपणे करु शकते. आयुष्यात प्रत्येक कामात सर्वोत्तम ध्यास असला पाहिजे. दर्जेदार उपक्रम करण्यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी आग्रही असले पाहिजे. शिवाजी विद्यापीठाने केलेली प्रगती राज्यात अव्वल आहे. भविष्यातही विद्यापीठाने आपली कामगिरी उंचावत अधिकाधिक लौकिक प्राप्त करावा.

कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योगनिर्मिती, नाविन्यपूर्ण व अभिनव संशोधन केले. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भविष्यवेधी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाच्या जोरावर विद्यापीठाने यशस्वी वाटचाल केली आहे. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. तृप्ती करेकट्टी आणि धैर्यशील यादव यांनी केले. यावेळी अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. एम. व्ही. गुळवणी, डॉ.आर. जी. सोनकवडे, डॉ. ए. ए. गुरव, डॉ. पी. टी. गायकवाड, अजित चौगुले, डॉ. अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आत्मनिर्भर'ची जबाबदारी विद्यापीठांवर

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंखे; विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा उत्साहात

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : 'शिवाजी विद्यापीठ राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा शिक्षणाचा वारसा जोपासत आहे. मराठी संस्कृती जपण्यात विद्यापीठाचा पुढाकार असून, आत्मनिर्भर भारत बनविण्याची जबाबदारी



विद्यापीठांवर आली आहे. विज्ञान हा भारतीय संस्कृतीचा महत्त्वपूर्ण भाग आहे. इंग्रजांनी भारतात विज्ञान आणले नाही. उलट नैसर्गिक स्रोतांची लूट केली. इथल्या देशप्रेमींनी स्वदेशी विज्ञानाचा वारंवार पाठपुरावा केला,' असे प्रतिपादन दिल्ली येथील इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजी या संस्थेचे संचालक डॉ. दिनकर साळुंखे यांनी आज येथे केले. नवभारताच्या उभारणीत विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असेल, प्रामाणिकपणा व बांधिलकी या गुणांच्या बळावर विद्यार्थ्यांनी, सर्वोत्कृष्टतेचा ध्यास बाळगा,' असेही आवाहनही त्यांनी यावेळी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत सोहळ्यात ते बोलत होते.

पान ११ वर »



कोल्हापूर : विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात ऑनलाईन मार्गदर्शन करताना डॉ. दिनकर साळुंखे.

# 'आत्मनिर्भर'ची जबाबदारी विद्यापीठांवर

» पान १ वरून

कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर सोहळा ऑनलाईन झाला. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी अध्यक्षस्थानी होते. 'शिव-वार्ता' यू ट्यूब वाहिनीवरून प्रसारित झालेल्या कार्यक्रमात सुमारे ३५०० जण ऑनलाईन सहभागी झाले. कार्यक्रमाद्वारे ६२,३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या. राजर्षी शाहू सभागृहात सोहळा झाला.

डॉ. साळुंखे म्हणाले, 'नवस्नातकांनी बौद्धिक चपळता वाढवणे महत्त्वाचे आहे. एखादी नवीन संधी येते, तेव्हा ती मिळवण्यासाठी तुम्ही सदैव तत्पर राहता आणि तुमच्या स्वतःच्या संधी निर्माण करण्यासाठीही तयार असता. विद्यार्थी म्हणून मिळवलेले शिक्षण आणि ज्ञान यावर आधारित तुमचा स्वतःचा मार्ग तयार केला पाहिजे. विद्यापीठ साठ वर्षांत राष्ट्र उभारणीच्या कार्यात मोलाचा वाटा उचलत असून, सर्वच क्षेत्रांसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध करून देत आहे. भारताच्या वैज्ञानिक प्रगतीच्या पार्श्वभूमीवर व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या झोतात विद्यापीठ प्रयत्न व क्षमतेच्या बळावर सर्व क्षेत्रांत आघाडी घेईल आणि एक दिवस देशातील उच्चशिक्षणाच्या सर्वोत्तम संस्थांमध्ये गणले जाण्याइतकी मोठी झेप लवकरच घेईल.'

राज्यपाल कोश्यारी म्हणाले, 'भारताची वाटचाल व प्रगती यात जेव्हा प्रत्येक घटकाचे योगदान लाभेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने देश सर्वश्रेष्ठ आणि आत्मनिर्भर होईल. त्या दृष्टीने युवा पिढीने योगदान देण्यास सज्ज व्हावे. सध्या जग विविध समस्यांनी ग्रस्त आहे. त्यावर उपाय योजण्याचे काम युवा पिढीच सक्षमपणे करू शकते.' इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे जसे विशेष स्थान आहे, तसेच स्थान शैक्षणिक क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाने प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत तांत्रिक अडचणीमुळे समारंभात सहभागी होऊ शकले नसून, त्यांनी स्नातकांना शुभेच्छा दिल्याचे सांगितले.

तत्पूर्वी, कुलगुरू कार्यालयापासून ते राजर्षी शाहू सभागृहापर्यंत दीक्षांत मिरवणूक झाली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी ज्ञानदंड घेऊन मिरवणुकीचे नेतृत्व केले. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. जी. कुलकर्णी आणि आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. (श्रीमती) एम. व्ही. गुळवणी सहभागी झाले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी पसायदान सादर केले. डॉ. तृप्ती करेकट्टी व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

लोकमत

# उच्च माध्यमिक शिक्षणात गणित विषय सोडू नका

## मद्वाना : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ग्रामीण विद्यार्थ्यांनी भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, किशोर विज्ञान प्रोत्साहन योजना यासाठी प्रयत्न करावेत. संशोधनातील सर्व क्षेत्रांत गणित गरजेचे असल्याने उच्च माध्यमिक शिक्षणादरम्यान हा विषय सोडू नका, असे आवाहन करिअर सल्लागार डॉ. मोहन मद्वाना यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील विज्ञान जागृती सप्ताहांतर्गत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भौतिकशास्त्र विभागातील या कार्यक्रमास रसायनशास्त्र विभागाचे प्रा. एस. डी. डेळेकर, एसएआयएफ - डीएसटी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे प्रमुख उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात उद्या महिला मेळावा, प्रदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, फेस्कॉम प्रादेशिक विभाग सांगली व कोल्हापूर, सावित्रीबाई फुले ज्येष्ठ नागरिक सेवा संघातर्फे दि. ७ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत जागतिक महिला दिनानिमित्त मेळावा व महिला उद्योजिकांसाठी उद्योग प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महिला सहभागी होणार आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.